MHAU030016322025

**पी.डब्ल्यु. डी. व्ही. ए. क्र.५०/२०२५**
**नि.क्र.०१ खाली अंतरिम पोटगीवरील आदेश**
**फरहीन पठाण वि. सलमान अहमदखान व इतर**

अर्जदाराने कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ अन्वये गैरअर्जदारांविरुध्द अर्ज दाखल केलेला आहे. त्यात सदर कायदयाचे कलम २३ अन्वये गैरअर्जदार यांचे कडुन **''अंतरिम पोटगी''** मिळणेसाठी अर्जामध्ये मागणी केली आहे.

०२. अर्जदार क्र.१ हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे दिनांक १२.०६.२०२२ रोजी औरंगाबाद येथे झाले होते. अर्जदार क्र.२ हि त्यांची मुलगी आहे व त्यांचे पती–पत्नी म्हणुन त्यांचे नातेसंबंध आजही कायम आहे. अर्जदार क्र.१ हि तिच्या आईस एकुलती एक मुलगी असुन तिच्या लग्नाचा संपुर्ण खर्च त्यांनी केला होता व तिचे लग्न थाटामाटात लावुन दिले होते. लग्नानंतर ती तिच्या सासरी नांदण्यास गेली. तेथे गैरअर्जदार क्र.१ ते ३ एकत्र राहत होते. गैरअर्जदार क्र.४ हि नाशिक येथे राहत असुन ती नेहमी माहेरी येत जात असायची. सुरुवातीला काही दिवस सर्व गैरअर्जदारांनी अर्जदारास चांगले नांदविले. त्यानंतर त्यांनी सतत तिचा मानसिक व शारिरिक छळ करण्यास सुरवात केली. गैरअर्जदार हे तिला म्हणत असे की, तुझ्या आई–वडीलांनी आमच्या इच्छेप्रमाणे लग्न करुन दिले नाही व आम्ही

तुझ्याशी लग्न करुन फसलो आहे. असे म्हणुन ते तिला सतत हिनवत असत.

०३. अर्जदार क्र.१ हि सुरवातीला काही दिवसांमध्ये तिच्या माहेरी गेली असता गैरअर्जदार यांनी तिला सतत पैसे आणण्याकामी तगादा लावला होता. ते तिला असे म्हणत असत की, तुझ्या आई–वडीलांनी अता लग्न लावुन दिले आहे. त्यामुळे तुला सासरचा थोडा त्रास सहन करावा लागेल. अर्जदार क्र.१ चे पुढे असे म्हणणे आहे की, दिनांक ०६.०१.२०२५ रोजी तिला गैरअर्जदारांनी अमानुष मारहाण करुन घरातुन हाकलुन दिले. त्यामुळे, तिच्यावर माहेरी राहण्याची वेळ आली आहे. तिचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा कंपनीमध्ये नोकरी करत असुन त्याला दरमहा रुपये ४५,०००/– इतका पगार मिळतो. त्यामुळे, तिने उदरनिर्वाकरीता प्रत्येकी रुपये १५,०००/– इतक्या अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

०४. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांचा लेखी म्हणणे दाखल केले असुन त्यांनी अर्जदार क्र.१ सोबतचे नातेसंबंध त्यांनी मान्य केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, तिने सर्व खोटे व खोडसाळ आरोप त्यांच्यावर लावले आहे. मुळात तिच्या आई–वडीलांनी लग्नामध्ये कुठलाही खर्च केला नव्हता. तसेच, गैरअर्जदारांनी त्यांच्याकडुन कुठल्या प्रकारे अवास्तव पैशांची मागणी देखील केली नव्हती. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ ही एकुलती एक असल्याने ती सतत छोटया कारणांवरुन त्यांच्याशी भांडण करुन माहेरी जायची व तिच्या आईला व भावाला देखील सतत फोन करुन

सासरकडे घडणाऱ्या किरकोळ बाबी सांगायची. यासर्व कारणांमुळे तिला तिच्या सासरची ओढ निर्माण झाली नाही. ती गर्भवती असतांना देखील गैरअर्जदारांनी तिची सर्व प्रकारे काळजी घेतली व तिला कुठल्याही प्रकारचा त्रास दिला नाही. अर्जदार क्र.१ हि गैरअर्जदारांना न सांगता स्वतःहुन माहेरी निघुन गेली आहे. त्यामुळे, तिला पोटगी मागण्याचीी कुठलाही अधिकार नाही. त्यामुळे तिची अंतरिम पोटगी मागणी नामंजुर करण्यात यावी असे गैरअर्जदारांचे म्हणणे आहे.

०५. सदर अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थितीत झालेले आहेः-

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सकृतदर्शनी अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे तरतुदी प्रमाणे पीडीत व्यक्ती आहे काय ? | होय. |
| २. | सकतदर्शनी गैरअर्जदारास पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ३. | सकृतदर्शनी अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबतः-**

०६. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न दिनांक

१२.०६.२०२२ रोजी झाले होते. गैरअर्जदार यांनी अर्जदारास काही दिवस चांगले नांदविले. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस शारिरीक, मानसिक, भावनिक व शाब्दीकस्वपात छळ करुन शिवीगाळ व मारहाण केली असल्याचे तिचे म्हणणे आहे. अर्जदार हिने तिच्यावर शारिरीक, मानसिक व कौटुंबिक अत्याचार झाल्याचे कथन केले आहे.

०७. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचे आजतागायत उदरनिर्वाहाची सोय केल्याचे दिसत नाही. तसेच त्याने स्वतःहुन अर्जदारास पोटगी म्हणुन काही रक्कम दिल्याचे दिसुन येत नाही. अर्जदाराने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने व कौटुंबिक हिसांचार हया संज्ञेची कायदेशीर व्यापकता लक्षात घेता अर्जदार ही सकृतदर्शनी कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायद्याचे तरतुदीप्रमाणे पिडीत महिला असल्याचे दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

०८. अर्जदाराने कथन केले की, तिला स्वतःचे उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा कंपनीमध्ये नोकरीस असुन त्याला दरमहा ४५,०००/– रुपये इतके उत्पन्न मिळते. परंतु, ते दाखविण्याकरीता, तिने अभिलेखावर काही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

०९. अर्जदाराने त्यांचा खर्च, उत्पन्न व दायित्व याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार ही गैरअजदार क्र.१ यांची पत्नी असल्याने तिचा सांभाळ करण्याची

कायदेशीर व नैतिक जबाबदारी ही गैरअर्जदार क्र.१ वर असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांना पोटगी देण्याबाबत कोणताही आदेश आजतागायात झालेला नाही. अशा परिस्थितीत जीवनावश्यक वस्तुंचा किमंती, गैरअर्जदाराचे सकृतदर्शनी उत्पन्न, जबाबदाऱ्या व त्यांचे राहणीमानाचा दर्जा याबाबी विचारांत घेता अर्जदारास रुपये ०७,०००/– इतकी रक्कम गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे असे मत मी नोंदवित आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबतः–</u>**

१०. मुद्दा क्र.१ ते ३ वरील विवेचनावरुन अर्जदाराला रुपये ०७,०००/– इतकी रक्कम गैरअर्जदार कडून दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासुन प्रत्येकी दरमहा १५,०००/– रुपये इतकी अंतरिम पोटगी मिळावी अशी मागणी केलेली आहे. परंतु, अंतरिम पोटगी मंजुर करते वेळी ती अन्यायकारक ठरणार नाही या गोष्टीचा विचार देखील होणे गरजेचे आहे. त्यामुळे, तिने केलेली मागणी ही रास्त वाटत नाही व अभिलेखावर दाखल असलेल्या प्रथमदर्शनी पुराव्यावतुन गैरअर्जदार यांचे निश्चीत उत्पन्न किती आहे हे दिसुन येत नाही.

११. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचीत ठरेल. गैरअर्जदार क्र.१ ने सदर अर्जाचे कामकाज चालु असतांना अर्जदारास उदरनिर्वाहकामी कोणतीही

आर्थिक तरतूद केलेली नाही. ही बाब विचारात घेता सदर पोटगीची रक्कम अर्जदाखल तारखेपासून अर्जदारास देण्याचा आदेश करणे न्यायोचित ठरेल. तसेच सदर अर्जाचा खर्च म्हणुन अर्जदारास रक्कम रुपये २,०००/- इतका खर्च देणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.४ करिता मी खालील आदेश पारित करीत आहेः

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांना मिळुन रुपये ०७,०००/- इतकी रक्कम दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन अर्ज दाखल तारखेपासुन पुढील आदेश होईपर्यंत दयावेत.

३. अर्जदार हिस प्रस्तुत अर्जाचा खर्च रु.२,०००/- (रु. दोन हजार मात्र) गैरअर्जदार क्र.१ यांनी दयावा.

४. सदर आदेशाची एक प्रत अर्जदार हिस विनामूल्य दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2025.11.05 14:05:12 +0530

दिनांक :- ०३/११/२०२५.

(अ. वि. मुसळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.०६, औरंगाबाद.